दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १८९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.९ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## खासगी बसला भीषण आग; ११ जणांचा मृत्यू

**नाशिक । वृत्तसंस्था**

औरंगाबाद रस्त्यावर आज पहाटेच्या सुमारास भीषण अपघात घडला आहे. मिरची चौकात पहाटेच्या सुमारास खासगी बसला अचानक आग लागली. ही आग इतकी भयंकर होती की संपूर्ण बस जळून खाक झाली आहे. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला असल्याची प्राथमिक माहिती समोर येतेय.

शनिवारी पहाटे ४ वाजून २० मिनिटांनी हा अपघात झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या गाड्या आणि पोलिसांचं पथक दाखल झालं आहे. तसंच, बचावकार्य सुरू असल्याचं म्हटलं जात आहे. दहा मयत पुरुष आहेत तर २१ प्रवाशी जखमी आहे. यापैकी एकजण गंभीर जखमी आहे. त्यांना जिल्हा रुग्णालयातून दुसरीकडे पुढील उपचारांसाठी हालवण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी गंगाधरन डी यांनी दिली आहे.

# धनुष्यबाण चिन्ह निवडणूक आयोगाने गोठवले, शिवसेना नावालाही बंदी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का देणारी बातमी आहे. शिवसेनेचं धनुष्यबाण चिन्ह केंद्रीय निवडणूक आयोगाने तात्पुरत्या स्वरुपात गोठवलं आहे. शिवसेना हे नावही उद्धव ठाकरे किंवा एकनाथ शिंदे या दोन्ही गटांना वापरता येणार नाही. शिवसेना कोण याचा फैसला निवडणूक आयोगाला करता न आल्यामुळे हा अंतरिम निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अंधेरी पोटनिवडणुकीत उद्धव ठाकरेंना धनुष्यबाण हे चिन्ह वापरता येणार नाही. हा निर्णय तात्पुरत्या स्वरुपाचा असून केवळ आगामी निवडणुकापुरता मर्यादित आहे. हा निर्णय बदलला जाऊ शकतो. आता उद्धव ठाकरे कोणतं चिन्हं निवडणार याची उत्सुकता आहे**

गेल्या तीन दशकांपासून जे चिन्ह शिवसेनेच्या अस्मितेशी जोडलेलं होतं, ते धनुष्यबाणाचं चिन्ह आता शिवसेनेच्या हातातून निसटलं आहे. निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीच्या तोंडावर हा तात्पुरता निर्णय देत हे चिन्ह गोठवलं आहे. त्यामुळे दोन्ही गटांना आता हे चिन्ह वापरता येणार नाही. शिंदे आणि ठाकरे या दोन्ही गटांचा या चिन्हावर दावा असणार नाहीये. सोमवारपर्यंत नव्या चिन्हासाठी तीन पर्याय दुपारी तीनपर्यंत सादर करावे लागतील.




### ठाकरे गटाने प्रभावीपणे केला होता दावा..

तत्पूर्वी ठाकरे गटानं आज त्यांच्याकडील महत्त्वाची माहिती निवडणूक आयोगात सादर केली होती. शिवाय अंधेरी पोटनिवडणुकीत शिंदे गटाचा उमेदवारच नाही मग चिन्ह का मागतायत असा सवाल ठाकरे गटानं निवडणूक आयोगासमोर केला होता. शिवाय शिंदेंनी अद्याप उद्धव ठाकरेंच्या पक्षप्रमुख पदावर दावा केलेला नाही. त्यामुळे चिन्हाबाबतचा दावा पक्षप्रमुखांच्या परवानगीविना होऊ शकत नाही असं ठाकरे गटानं म्हटलं होतं. आमच्याकडे राजधानी दिल्लीमध्ये दहा लाखांपेक्षा अधिक शपथ पत्र तयार आहेत. अडीच लाख पदाधिकाऱ्यांची शपथपत्रे आणि दहा लाखांपेक्षा अधिक प्राथमिक सदस्यांची शपथपत्रे तयार आहेत. फक्त विहित नमुन्यामध्ये ती सादर करण्यासाठी आम्हाला चार आठवड्यांचा वेळ मिळावा. जर निवडणूक आयोगाला ती आत्ता आहे त्या स्थितीत हवी असतील तर ती पण आम्ही सादर करू, असा दावा उद्धव ठाकरे गटाचा निवडणूक आयोगासमोर केला होता.

## महाड खाडीपट्टा विभागात वीज चोरीला ऊत

### महावितरणची धडक मोहिम : २४ जणांविरुद्ध कारवाई



**दै.रायगड नगरी । महाड**

महाड तालुक्याच्या खाडीपट्टा विभागात मोठ्या प्रमाणावर वीज चोरी होत आहे. या वीज चोरीमुळे महावितरणला दर महिन्याना १७ लाख रुपयांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर, महावितरणने या वीज चोरांविरोधात धडक मोहिम सुरु केली असून सुमारे सातशे मीटर्स जप्त केले आहेत. तर २४ जणांकडून झालेली सात लाख रुपयांची वीज चोरी आतापर्यंत पकडण्यात आली आहे.

खाडीपट्टा विभागातील कुंबळे फिडरवरुन कुंबळे, महाड ग्रामीण आणि वहूर या तीन सेक्शनमध्ये वीज पुरवठा होतो. गेल्या काही महिन्यांपासून या फिडरवरुन महिन्याकाठी ३० टक्के (सुमारे १७ लाख रुपये ) तोटा होत आहे. ही बाब निदर्शनास आल्यानंतर महावितरणने पन्नास अधिकारी आणि कर्मचार्यांच्या सात तुकड्या करून शोध मोहिम राबविली. या शोधमोहिमेत सुमारे ७०० मीटर बंद अवस्थेत, एमसीएल लावून बंद केलेले आढळून आले. हे सर्व मीटर जप्त करण्यात आले आहेत. या मीटर्सची तपासणी सुरु असून आतापर्यंत चोवीस मीटर्समधून सात लाख रुपयांची वीज चोरी झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यात जुई तेलंगे, चिंभावे, रावढळ आणि वलंग या गावांतील ग्राहकांचा समावेश आहे. ही शोध मोहिम आणि मीटर तपासणी सुरुच राहणार असून त्यामुळे हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जुई तेलंगे, चिंभावे, रावढळ आणि वलंग या गावांतील ग्राहकांचा समावेश आहे. १८६ बंद मीटर्स या मोहिमेदरम्यान बदलण्यात आले आहेत.


या पार्श्वभूमीवर, ग्राहकांनी आपले बंद मीटर त्वरीत बदलून घ्यावेत त्याचप्रमाणे थकबाकी त्वरीत भरावी अन्यथा कारवाई करण्यात येईल असा इशारा महावितरणने दिला आहे.

## ट्रेनने प्लॅटफॉर्म अचानक बदलल्याने प्रवाशांची उडाली धावपळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल रेल्वेस्थानकात दिवा-रोहा पॅसेंजर रेल्वे प्लॅटफॉर्म व्यतिरीक्त मधोमध थांबल्याने प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. काही सेकंदच ही गाडी थांबणार असल्याने गाडी पकडण्यासाठी अनेकांना जीवाची पर्वा न करता प्लॅटफॉर्म पाच व सहा येथून रुळ ओलांडून गाडी पकडली. या दरम्यान इतर कोणतीही जलद गाडी न आल्याने मोठी जीवित हानी टळली.**

आज सकाळी ९ वाजून २० मिनिटांनी पनवेल स्थानकात दिवा रोहा पॅसेंजर या रेल्वेच्या मोटारमनने प्लॅटफॉर्म नसलेल्या ठिकाणी जेथे मालगाडी ट्रेन उभ्या करतात तेथे (रेल्वेलाईन क्रमांक तीन) रेल्वे उभी केली. दिवा-रोहा पॅसेंजरची प्रतीक्षा प्रवासी प्लॅटफॉर्म क्रमांक पाच-सहावर उभे होते. नियमित याच प्लॅटफॉर्मवर ही गाडी येत असल्याने शेकडो प्रवाशी त्यावेळी प्लॅटफॉर्मवर उभे होते. अचानक रेल्वे येऊन प्लॅटफॉर्म नसलेल्या ठिकाणी गाडी थांबविल्याने प्रवाशांनी गाडी पकडण्यासाठी प्लॅटफॉर्मखालील रुळ ओलांडण्यासाठी एकच पळापळ केली. या दरम्यान इतर कोणतीही जलद रेल्वेगाडी न आल्याने मोठा अनर्थ टळला.



## महिलेला मारहाण; गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । महाड**

किरकोळ कारणावरून महिलेला मारहाण करणाऱ्या एका इसमाविरोधान एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कांबळे तर्फे बिरवाडी येथे हा प्रकार घडला.

सौ. सुनंदा देशमुख (वय ६५ ) या घरासमोर सफाई करित असलेल्या काशिराम मुकणे आणि तांबे नावाच्या सफाई कामगाराशी बोलत असताना क्षुल्लक कारणावरुन सफाई कामगाराने एका राकेश प्रताप देशमुख तेथे आला आणि त्याने सुनंदा देशमुख यांच्याशी वाद घालीत त्यांना शिविगाळ सुरु केली. एवढ्यावरच न थांबता हातातील लोखंडी पंज्याने त्यांच्या डोक्यावर आणि हातावर मारहाण करीत त्यांना लाथाबुक्क्यांनीही मारहाण केली. या प्रकरणी सुनंदा देशमुख यांनी दिलेल्या तक्रारीनुसार राकेश देशमुख याच्या विरोधात भा. दं. वि. कलम ३२४, ३२३, ५०४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## कुर्ल्यातील रहिवासी इमारतीला भीषण आग

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कुर्ल्यातील नवीन टिळकनगर भागातील रहिवासी इमारतीला भीषण आग लागली आहे. आज दुपारी दोन वाजल्यानंतर ही आग लागली असून, अग्निशमन दलाच्या आठ गाड्या घटनास्थळी दाखल आले आहेत. तसेच अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्याचं काम सुरू आहे.

मुंबईतीलकुर्ला येथील लोकमान्य टिळक टर्मिनसजवळ अजलेल्या रेल ह्यू या रहिवासी इमारतीला ही आग लागली आहे. ही आग नेमकी कशी लागली याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही.

या बारा इमारतीमधील वरच्या मजल्यावरील एका रूममध्ये ही आग लागली आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली आहे. तसेच अग्निशमन दलाच्या आग गाड्या आग शमवण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

दरम्यान, आगीमुळे काही लोक इमारतीमध्ये अडकले आहेत. या आगीचे काही व्हिडीओ समोर आले असून, त्यामध्ये दोन व्यक्ती खिडकीतून बाहेर पडून तिथे असलेल्या स्लॅबवर उभे राहून जीव वाचवण्याच प्रयत्न करताना दिसत होते.

दरम्यान, या आगीसाठी अग्निशमन दलाने २ क्रमांकाचा कॉल दिलेला आहे. आग शमवण्याचे प्रयत्न सुरू आहे.

## श्रीवर्धन तालुक्यात नियोजना अभावी एप्रिल महिन्याच्या अखेरीपासून निर्माण होते पाणीटंचाई

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

**गेल्या अनेक वर्षांच्या पाहणीतून असे निष्पन्न होते की, श्रीवर्धन तालुक्यात कितीही पर्जन्यवृष्टी झाली. तरीही पाण्याचे योग्य नियोजन होत नसल्यामुळे एप्रिल महिन्याच्या अखेरीपासून तालुक्यामध्ये तसेच श्रीवर्धन शहरात पाणीटंचाई जाणवण्यास सुरुवात होते.**

श्रीवर्धन शहर व आजूबाजूच्या खेडेगावात पाणी पुरवठा करण्यासाठी रानवली येथे असलेला एकच पाझर तलाव उप-लब्ध आहे. साधारण १९७० सालानंतर या पाझर तलावाची निर्मिती करण्यात आली. त्यावेळी श्रीवर्धन शहराची तसेच आजूबाजूच्या परिसराची लोकसंख्या अत्यल्प होती. त्यामुळे पाणी पुरत असे. परंतु आज मीतीला श्रीवर्धन शहरासह आजूबाजूच्या परिसरात देखील पूर्वीच्या लोकसंख्येपेक्षा चार पट लोकसंख्या झालेली आहे. आराठि ग्रामपंचायत हद्दीमध्ये अनेक टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या असून तीन मजल्यांच्या अनेक इमारती आहेत. या सर्व इमारतींना रानवली पाझर तलावा मधूनच पाणीपुरवठा करण्यात येतो. इतके दिवस या पाझर तलावाच्या पाझरणाऱ्या पाण्यातूनच पाणीपुरवठा करण्यात येत असे. त्यामुळे अनेक नागरिक सर्रासपणे उन्हाळ्यात रस्त्यावरती पाणी मारणे, आपल्या चारचाकी, दुचाकी गाड्या त्या पाण्याने धुणे. याशिवाय वारंवार आपले दुकान गाळे धुऊन काढणे यासाठी पाण्याचा वापर करत असत. श्रीवर्धन शहरासह आजूबाजूच्या परिसरात अनेक वेळा नागरिक रबरी पाईप लावून धरणाचे पाणी झाडांना देखील सोडण्याचे प्रकार घडत होते. परंतु आता या पाझर तलावाच्या पाण्याचे शुद्धीकरण करण्यासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. तसेच रानवली पाझर तलावापासून श्रीवर्धन पर्यंत नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

जलशुद्धीकरण प्रकल्प अस्तित्वात आल्यानंतर श्रीवर्धन नगरपरिषद व आजूबाजूच्या परिसरात नागरिक वापरत असलेल्या पाण्याला मीटर बसवण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून नागरिकांकडून पाण्याचा अपव्यय होणार नाही. एप्रिल महिन्यापासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने अनेक नागरिक थेट जलवाहिनीला विद्युत पंप बसवून पाणी खेचत असल्यामुळे शहरातील अनेक भागांमध्ये अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होतो. किंवा काही भागांमध्ये पाणीपुरवठा होतच नाही. मात्र नळ जोडणी धारकांना मीटर बसवल्यानंतर पंपाने पाणी खेचणे देखील परवडण्यासारखे नाही. त्यामुळे या गोष्टीवर देखील चाप बसणार आहे. श्रीवर्धन तालुक्यात असलेल्या रानवली, जसवली, भोस्ते, आराठी या ग्रामपंचायतीमध्ये देखील रानवली धरणाचे पाणी उपलब्ध करण्यात येते. त्या ठिकाणी देखील पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे श्रीवर्धन नगरपरिषदेने देखील पाण्याचे नियोजन योग्य प्रकारे करून नागरिकांना पुढील वर्षीचा पाऊस सुरू होईपर्यंत पाणी उपलब्ध होईल याबाबत उपाययोजना करण्याची गरज आहे. श्रीवर्धन शहर हे समुद्रकिनाऱ्यालगत वसलेले असून याठिकाणी विहिरींना असणारे पाणी मचूळ चवीचे आहे. तसेच रानवली पाझर तलावामधून येणारे पाणी गोडे आहे. त्यामुळे नागरिकांकडून या पाण्याचा वापर पिण्यासाठी केला जात असे. मात्र जलशुद्धीकरण प्रकल्प नसल्यामुळे अनेक नागरिक हे पाणी उकळून, गाळून पीत असत. जलशुद्धीकरण प्रकल्पातून येणारे पाणी वितरित करताना नगरपरिषदेने त्या ठिकाणी मीटर न बसविल्यास पाण्याचा अपव्यय नागरिकांकडून होणे नाकारता येत नाही. सद्यस्थितीत श्रीवर्धन नगरपरिषद सर्व नागरिकांना एकाच रकमेचे पाणी बिल वर्षातून वसूल करत असते. परंतु मीटर प्रमाणे पाणी वापरानुसार बिल वसूल केल्यास पाण्याच्या वापरावरती निश्चित निर्बंध येतील.

## उद्धव काकांनी जबाबदारी दिली तर पक्षासाठी काम करेन : जयदीप ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेनेचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे आणि शिवसेनेवर दावा केलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील संघर्ष आता आणखी तीव्र झाला आहे. हे दसरा मेळाव्यांच्या निमित्ताने स्पष्ट झाले आहे. ठाकरे आणि शिंदे गटाचे दसरा मेळावे पार पडले. यावरून दोन्ही गटाच्या दसरा मेळाव्याची चर्चा सुरु आहे. दसरा मेळाव्यात उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी एकमेकांवर घणाघाती टीका केली.

शिंदे गटाच्या दसरा मेळाव्यात जयदेव ठाकरे, स्मिता ठाकरे, निहार ठाकरे उपस्थित होते. तर ठाकरे गटाच्या मेळाव्यात जयदेव ठाकरे यांचे पुत्र आणि बाळासाहेब ठाकरे यांचे मोठे नातू जयदीप ठाकरे उपस्थित होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी जबाबदारी दिली तर पक्षासाठी काम करीन, असे जयदीप ठाकरे यांनी म्हटले आहे. ते म्हणाले, मी बाळासाहेबांचा मोठा नातू, त्या नात्याने जबाबदारी पार पाडत आहे. खरी शिवसेना कोणाची हे सर्वांना माहीत आहे. शिवसेनेत दोन गट पडतील, असे कधीच वाटले नव्हते. कोरोना काळात काका स्वतः आजारी असताना त्यांनी खूप चांगल काम केले आहे. याचबरोबर, मी आतापर्यंत दसरा मेळाव्याबद्दल ऐकत होतो, पण यावर्षी गेलो आणि अनुभव घेतला. उद्धव काकांनी संधी दिली तर मी नक्की राजकारणात येईन. बाकी कुटुंब कोणाला पाठिंबा देतंय याबाबत मला बोलायचं नाही. मी बाळासाहेबांचा मोठा नातू म्हणून उद्धव काकांच्या दसरा मेळाव्यात गेलो होतो. मोठा नातू म्हणून मी जबाबदारी पार पाडत आहे, असेही जयदीप ठाकरे यांनी म्हटले आहे. दरम्यान, सध्याचे राजकीय वातावरण पाहता राज्याच्या राजकारणात आणखी एक ठाकरे येणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

## पोलिसाला धक्काबुक्की करणारे दोघे ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मद्यधुंद अवस्थेतील तरुणांचे भांडण सोडवणाऱ्या पोलिसाला दोघा तरुणांनी धक्काबुक्की करून त्याच्या हाताला चावा घेतल्याचा प्रकार उलवे सेक्टर १८ येथे घडला. निरज जितेंद्र सिंग दहिया (३२) व महेंद्र देवाराम शोमरवाल (२७) अशी या तरुणांची नावे असून न्हावाशेवा पोलिसांनी या दोघांविरोधात सरकारी कामात अडथळा आणून हाणामारी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून दोघांना ताब्यात घेतले आहे.

या घटनेतील जखमी झालेल्या पोलीस शिपाईचे नाव प्रेम पाटील (३०) असे असून ते न्हावाशेवा पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. प्रेम पाटील व आरटीपीसी वाळुंज हे दोघेही उलवे सेक्टर १८ येथे गस्त घालण्यासाठी गेले होते. त्यावेळी ते प्रियंका युनाईट बिल्डिंगसमोर आले असता त्याठिकाणी मद्यधुंद अवस्थेतील निरज दहिया व महेंद्र शोमरवाल महेश सूर्यवंशी याला मारहाण करत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पोलीस शिपाई प्रेम पाटील हे त्याला सोडवण्यासाठी गेले असता शोमरवालने त्यांना ढकलून दिले. याचवेळी दहीयाने त्यांच्या हाताचा चावा घेतला व त्यांना जखमी केले. त्यानंतर तिघांना पोलीस ठाण्यात नेऊन दहीया व शोमरवाल या दोघांविरोधात सरकारी कामात अडथळा निर्माण करून मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

## माथेरान पतसंस्थेच्या निवडणुकीत शिवराष्ट्र पॅनल विजयी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, माथेरान या संस्थेची सन २०२२-२३ ते सन२०२७/२८ या कालावधी साठीची निवडणूक दि.७ ऑक्टोबर रोजी शास्त्री हॉल ( कम्युनिटी सेंटर ) येथे पार पडली यामध्ये शिवराष्ट्र पॅनल विरुद्ध पिसारनाथ पॅनेल अशी लढाई झाली. यामध्ये शिवराष्ट्र पॅनलचे सर्वच १३ उमेदवार निवडून आले तर पिसारनाथ पॅनेलला निसटत्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. एकूण तेरा उमेदवार प्रत्येक पॅनेल मधून निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. पतसंस्थेत एकूण १२३५ सभासद आहेत त्यापैकी ९४५ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

सर्वसाधारण गटात आठ उमेदवार उभे होते यामध्ये शिवराष्ट्र पॅनेलचे माजी सभापती अजय सावंत(५४८ मते), कुलदीप जाधव ( ५२३ मते ),विवेक चौधरी ( ५२०मते ),विजय कदम (५१७ मते),सचिन दाभेकर ( ४६९ मते ), नितीन शेळके ( ४४५ मते),चंद्रकांत काळे ( ४२२) आणि विजय सावंत ( ४१५)मते प्राप्त करून हे सर्वच उमेदवार निवडून आले आहेत तर पिसारनाथ पॅनेलचे दिलीप कदम ((३४६), ज्ञानेश्वर बागडे (३६२),सलीम मुजावर ( ३४२), मनोहर रांजणे ( ३०४), नितीन शहा ( ३७४), संदीप शिंदे ( ३९६), सुनील शिंदे (३९८), अरविंद शेलार (३३३) मते मिळाली त्यामुळे पिसारनाथ पॅनेलच्या उमेदवारांना थोड्याशा फरकाने पराभवाला सामोरे जावे लागले आहे. सर्वाधिक ५४८ मते अजय सावंत यांना मिळाली आहेत.

अनुसूचित जाती जमाती प्रवर्गासाठी दोन्ही पॅनेल मधून एक एक उमेदवार त्यामध्ये शिवराष्ट्र पॅनेलचे गजानन अबनावे यांना (५२२) मते मिळाली तर पिसारनाथ पॅनेलचे सचिन काळे यांना (३७५ )मते मिळाली.इतर मागासवर्गीय करिता एक एक उमेदवार उभे होते यामध्ये शिवराष्ट्र पॅनेलचे निसार शारवान यांना (५०४)मते तर पिसारनाथ पॅनेलचे चंद्रकांत सुतार यांना (४०१ )मते मिळाली. महिला राखीव मध्ये निवडणुकी साठी प्रत्येकी दोन महिला उभ्या होत्या यामध्ये शिवराष्ट्र पॅनेलच्या स्वाती मोरे यांना (४९७) ,विनंती घावरे याना (५१५) मते मिळाली तर पिसारनाथ पॅनेलच्या अंजली येरफुले याना (३४०) मते आणि प्रतिभा घावरे यांना (३९४) मते मिळाली. भटक्या जाती जमाती गटात शिवराष्ट्र पॅनेलचे रामचंद्र ढेबे याना (४९२) मते तर पिसारनाथ पॅनेलचे संतोष आखाडे यांना (४०९)मते मिळाली. सकाळी आठ ते सायंकाळी चार वाजेपर्यंत मतदानाचा अधिकार मतदारांनी बजावल्यावर सायंकाळी पाचनंतर मतमोजणीला सुरुवात झाली.रात्री साडेदहाच्या सुमारास सर्व निकाल जाहीर करण्यात आला आणि शिवराष्ट्र पॅनेलचे सर्व उमेदवार निवडून आल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी शा. प्र.कपोते यांनी सांगितले.

# हिंसेचा भयप्रद अंमल

मेक्सिको आणि थायलंड या दोन मोठे भौगोलिक अंतर असणाऱ्या देशांमध्ये काही तासांच्या फरकाने दोन भयंकर हत्याकांडे झाली. या दोन्हींचे बाह्य स्वरूप भिन्न आहे. थायलंडच्या नान्बुआ लम्फू शहरातील पाळणाघरावर एका मारेकऱ्याने हल्ला करून ३७ जणांचे प्राण घेतले. यातील २४ लहान मुले होती. छोट्या बाळांना खाऊ देऊन पाळणाघरात सोडलेल्या आईबाबांना काही तासांनी त्यांचे निष्प्राण देह मांडीवर घ्यावे लागले. साऱ्या जगाचे समूहमन हेलावून टाकणारे हे नृशंस हत्याकांड आहे. दुसरीकडे, मेक्सिको या गुन्हेगारीसाठी प्रसिद्धच असलेल्या देशात सॅन मिग्युएल टोटोलपॅन या शहरातील शहरसभागृहात झालेल्या भीषण हल्ल्यात माफियांनी महापौर, महापौरांचे वडील, माजी महापौर यांच्यासहित वीस जणांना निर्दयीपणे संपवून टाकले. पहिले हत्याकांड एकांड्या गुन्हेगाराने संतापाच्या भरात केलेले दिसते; तर मेक्सिकोतील हत्याकांड ठरवून, शहरातील सत्ता खिळखिळी करण्यासाठी संघटित गुन्हेगारांनी केलेले दिसते. गुन्ह्याच्या ठिकाणी पोलिस किंवा संरक्षण दलांना लवकर पोहोचता येऊ नये, यासाठी वाटेतल्या रस्त्यांवर वाहनांची चळत उभी करण्याची कल्पना हॉलिवूडने गुन्हेगारांकडून उचलली की गुन्हेगार सिनेमांत पाहून तसे करू लागले, हा प्रश्नच आहे. मात्र, चारही बाजूंनी वाहने लावून मारेकऱ्यांच्या साथीदारांनी रस्ते अडवून धरले होते. थायलंडमधील मारेकऱ्याने निष्पाप बाळांची हत्या केल्यानंतर घरी जाऊन आपल्या पत्नीला आणि मुलालाही मारून टाकले. नंतर त्याने आत्महत्या केल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. या दोन अगदी वेगळ्या परिस्थितीत आणि वेगळ्या पार्श्वभूमीवर घडलेल्या हत्याकांडांमधला समान दुवा अंमली पदार्थांचा आहे. 'ड्रग्ज' या समान नावाने ओळखल्या जाणाऱ्या विविध स्वरुपाच्या अंमली पदार्थांनी जगाला किती मोठा विळखा घातला आहे आणि जगातल्या एकूण हिंसाचारात या 'ड्रग क्राइम' म्हणजे अंमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांचा किती प्रचंड हिस्सा आहे, याची कल्पनाही करता येणार नाही. अनेक देशांमधील सरकारे घालविणे किंवा ड्रग व्यापार आणि वाहतुकीला संरक्षण देणारी सरकारे कमकुवत देशांमध्ये आणून बसविणे, हा ड्रग माफियांच्या हातचा खेळ आहे. जगाच्या नकाशावर जसे अधिकृत व्यापारी मार्ग दाखवता येतात, तसेच अंमली पदार्थांच्या प्रवासाचेही महामार्ग दाखवता येतात आणि ते साऱ्या जगभरात पसरले आहेत. त्यांना सर्व संरक्षण आहे. जगभरात यंत्रणा किंवा पोलिसांकडून जप्त होणाऱ्या अंमली पदार्थांचे प्रमाण एकूणातील पाच टक्केही नसते. थायलंडमधला मारेकरी हा माजी पोलिस अधिकारी होता. तो पोलिस दलात असताना ड्रग व्यापाराशी संबंधित होता. त्याला त्याच संशयावरून काढून टाकण्यात आल्यामुळे तो अस्वस्थ होता. वरवर त्याने केलेले कृत्य माथेफिरू वाटले तरी त्याला पुढे करून ड्रग माफियांनी थायलंड सरकारला दिलेला हा इशाराही असू शकतो. ड्रग व्यापाराला धक्का लावाल तर अशी हत्याकांडे पुढेही घडवू, हा तो इशारा असू शकतो. बडतर्फ झालेल्या पोलिस अधिकाऱ्याचे डोके अशा सूडचक्रासाठी फिरवणे आणि नामानिराळे राहणे, या टोळ्यांना बिलकुलच अवघड नाही. या हत्याकांडाचा अधिक तपास होईल, तेव्हा वेगळे धागेदोरे पुढे आले तर आश्चर्य वाटायला नको. मेक्सिकोत मात्र ड्रग माफिया लपून छपून नव्हे तर उघडपणे सरकार आणि सत्तेला आव्हान देत असतात. या माफियांनी गेल्या काही काळात छोट्या मोठ्या नगरांचे १८ महापौर असे मारून टाकले आहेत. सहा लोकप्रतिनिधींनाही या टोळ्यांनी असेच संपविले आहे. अंमली पदार्थांच्या मुक्तपणे चालणाऱ्या व्यापाराला किंवा विक्रीला विरोध करणारा कुणीही मेक्सिकोत टिकू नये, इतकी भयंकर अवस्था तेथे आली आहे. मेक्सिकोच्या अध्यक्षांना वारंवार लष्कराला मदतीला घ्यावे लागते. कारण, पोलिसांच्या हाताबाहेर गेलेले हे प्रकरण आहे. अमली पदार्थांच्या जाळ्यातून मेक्सिको बाहेर यावा, यासाठी अमेरिका म्हणे बरेच साह्य करीत असते. प्रत्यक्षात काही वर्षांपूर्वी मेक्सिको आणि अमेरिका यांना जोडणारा प्रचंड बोगदा सापडला होता. तिथून हा व्यापार चाले. अंमली पदार्थांची वाहतूक, शस्त्रास्त्रे व्यापार, जगभरातल्या दहशतवादी संघटना आणि अनेक व्रात्य देशांमधील सरकारे यांचे गूळपीठ आहे. थायलंड किंवा मेक्सिकोत बळी पडलेले निष्पाप जीव म्हणजे जगभरात ड्रग्जच्या चोरट्या व्यापाराचे जे प्रचंड जाळे विणले गेले आहे; त्यांचे विषारी फळ आहे. दोन्ही हत्याकांडांमध्ये ज्या प्रकारे शस्त्रास्त्रांचा वापर झाला; त्यावरून शस्त्रे किती सहज उपलब्ध होऊ शकतात, हे समजते. मेक्सिकोत तर ते बिलकुल नवल नाही. याचे कारण, देशाच्या बहुतेक राज्यांत या टोळ्यांचाच शब्द चालतो. जगभरात असे हिंसाचाराचे उद्रेक होतात; तेव्हा त्यांच्या मागे बरेच काही घडत असते. अंमली पदार्थांचा विळखा भारतालाही ग्रासतो आहे. त्यापासून सुटका करून घेणे; हा या हत्याकांडांचा आपल्यासाठी धडा आहे. अन्यथा, उद्या अशी रक्तांची थारोळी भारतातही दिसल्याशिवाय राहणार नाहीत.

# उरण तालुक्यात मुले पळविणारी टोळी सक्रिय, पालक-मुले भयभीत

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात मुले पळविणारी टोळी सक्रिय झाली आहे.अशा प्रकारच्या सुचना रहिवाशी एकमेकांना देत आहेत. त्यामुळे शाळांमध्ये जाणारे विद्यार्थी गाव परिसरातील मुले त्यांचे पालक भयभीत झाले आहेत.त्यातच चिरनेर ग्रामपंचायतीने ठिक ठिकाणी मुले पळविणाऱ्या टोळी पासून सावधान अशा सुचना दर्शविणारे फलक लावल्याने रहिवाशी आप आपल्या मुलाला भयभीत स्थितीत शाळेत घेऊन जाताना दिसत आहेत.

दररोज इंटरनेटवर मुले पळविणाऱ्या टोळीच तसेच पळवून नेण्यात आलेल्या मुलांचे विचित्र व्हिडिओ व्हायरल होत असल्याने पालक चिंताग्रस्त झाला आहे. त्यातच उरण तालुक्यात मुले पळविणारी टोळी सक्रिय झाली आहे.अशा प्रकारच्या अफवा जनमानसात उमटत असतानाच चिरनेर ग्रामपंचायतीने ठिक ठिकाणी मुले पळविणाऱ्या टोळी पासून सावधान अशा स्वरूपाच्या सुचना दर्शविणारे फलक लावल्याने रहिवाशी भिंतीच्या सावटाखाली वावरत आहेत. नवीमुंबई पोलीस आयुक्त हद्दीतील उरण,मोरा आणि न्हावा शेवा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस अधिकारी वर्गाने अशा प्रकारच्या मुले पळविणाऱ्या टोळी संदर्भात जनजागृती किंवा कोणत्याही प्रकारची सुचना न दिल्याने उरण तालुक्यात खरच मुले पळविणारी टोळी सक्रिय झाली आहे का या भिंती पोटी पालक आप आपल्या मुलाला घरा बाहेर काढण्यासाठी किंवा शाळेत पाठविण्यासाठी धजावत नाही.त्यात काही पालक हे मूलांना दहशतीच्या छायेखाली शाळेत घेऊन जाताना दिसत आहेत.

# कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापडला पुरुष जातीचा मृतदेह

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत मौजे पळसदरी गावाच्या बाजूला पुरुष जातीचा मृतदेह आढळला असून याबाबत अद्याप ओळख पटलेली नसून पोलीस इसम कोण आहे याचा तपास करीत आहे.

मौजे पळसदरी गावाच्या बाजूला असलेल्या रेल्वे गेट जवळ कर्जत खोपोली रेल्वे ट्रॅक लगत सात फुटी ओढ्याच्या पाण्यात पुरुष जातीचा मृतदेह सापडला असून कर्जत पोलीस ठाणे या अनोळखी इसमा बाबत तपास करीत आहेत.

अनोळखी समाजाचे अंदाजे वय ३० ते ३५ वर्ष असावे सदर इसमाची उंची पाच फूट पाच इंच, मध्यम बांधा अंगात लाल रंगाचा गोल गळ्याचा हाफ टी-शर्ट, काळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट, तुझ्या हाताच्या मनगटावर काळ्या रंगाचा त्यावर एवेंजर नाव असलेला ब्रँड तसेच काळे व भगव्या रंगाचा दोरा, बोटांमध्ये पिवळ्या रंगाची रिंग आहे.

डोक्यास मार लागून मेंदू मध्ये रक्तस्त्राव होवून तसेच उजव्या फुफुसात रक्तस्त्राव झाल्याने मयत झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी केला आहे. कर्जत पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यू रजिस्टर नं-४४/२०२२ गुन्हा नोंद केली आहे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यु. एम.सुर्वे पुढील तपास करीत आहेत.

## पाली तहसीलदार दिलीप रायन्नावार यांच्या निरोप समारंभास अलोट गर्दी

# सुधागड तालुक्यातील जनतेचे प्रेम कायम स्मरणात राहील : दिलीप रायण्णावार

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात तहसीलदार म्हणून रुजू झाल्यापासून दिलीप रायन्नावार यांनी सलग तीन वर्षे आदिवासी बहुल तालुक्याचा सर्वांगीण कायापालट करण्याचा जणू ध्यासच घेतला होता. शासनाच्या विविध लोकाभिमुख व विकासात्मक योजना तळागाळातील लाभार्थी घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. सुधागड वासीयांच्या हृदयसिंहासनावर अधिराज्य गाजवणारे पाली तहसीलदार दिलीप रायन्नावार यांच्या निरोप समारंभ व नवे तहसीलदार उत्तम कुंभार यांचा स्वागत समारंभ मराठा समाज हॉल पाली येथे पार पडला. या कार्यक्रमास शासकीय, निमशासकीय व सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक व सेवाभावी क्षेत्रातील मान्यवर , पत्रकार , नागरिक या समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित होते. तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी सुधागड तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान अतुलनीय असल्याची प्रतिक्रिया यावेळी उपस्थित, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केली.



दरम्यान सुधागड तालुक्यातील जनतेचे प्रेम माझ्या कायम स्मरणात राहील, असे तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमास तहसीलदार उत्तम कुंभार, पोलीस निरीक्षक विश्वजित काईनगडे, शेकाप नेते सुरेश खैरे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, शिवसेना जिल्हा उपसंघटक राजेंद्र राऊत, पालीवाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर लहूपाचांग, प्रा.डॉ अंजली पुराणिक, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, नगरसेवक पराग मेहता, नगरसेवक सुलतान बेनसेकर, प्रभारी गटविकास अधिकारी महामुनी,पशुवैद्यकीय अधिकारी डॉ प्रशांत कोकरे, सीईओ विद्या येरूनकर, माजी सभापती रमेश सुतार, साक्षीताई दिघे, मराठा समाज अध्यक्ष गणपतराव सितापराव , रविंद्रनाथ ओव्हाल, ताराबाई सकपाळ, शरद गोळे, स्पर्धा परीक्षा सुधागड तालुका प्रमुख प्रा. संतोष भोईर, बशीर परबलकर,आदिवासी समाज अध्यक्ष चंद्रकांत वाघमारे, रमेश पवार, कृष्णा वाघमारे, मुयर कारखानीस आदींसह मान्यवर उपस्थित होते. तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी तालुक्यातील प्रत्येक गावात, आदिवासी वाडी, ठाकुरवाडी पिंजून काढून प्रशासकीय व वैयक्तिक सुद्धा मदत केली . त्यांनी आपल्या कार्य काळात तहसील कार्यालयात आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे काम ताबडतोब व्हायला हवे, यासाठी कार्यालयीन कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना व आदेश देत होते. सुधागड तालुक्यात फिरत असताना रस्त्याला एखादी वृद्ध चालताना दिसली तर त्या वडीलधारी वृद्ध व्यक्तीला आपल्या कार मध्ये घेऊन विचारपूस करणारे मोठ्या मनाचे अधिकारी म्हणून त्यांच्याविषयी सर्वांच्या मनात आपुलकी व आदरभाव निर्माण झाला होता. तहसीलदार यांच्या दालनात जाणारा सामान्यातला सामान्य माणूस सुद्धा केबिनमध्ये बिनदास्त जाताना दिसत होता . तालुक्यातील सर्व लाभार्थीना सरकारी सर्व योजनांचा जास्तीत जास्त लाभ व्हावा, आदिवासी बांधव यांना रेशन कार्ड त्वरित उपलब्ध व्हावे यासाठी ते कायम दक्ष राहून काम करत असत. आदिवासी कातकरी समाजातील विद्यार्थांनी शिक्षण घेतलं पाहिजे, यासाठी अनेक विद्यार्थ्यांना एल एल बी च्या प्रवेश परीक्षासाठी लागणारे मार्गदर्शन तसेच पुस्तके सुद्धा उपलब्ध करून दिली. आदिवासी स्थलांतरित न होता स्वतःचा रोजगार स्वतःच्या गावात निर्माण कसा करता येईल. यासाठी आदिवासी यांच्यासाठी सप्तसूत्री कार्यक्रमाचे मोठ्या प्रमाणात आयोजन केले. शासनाच्या सर्व योजना याबाबत जनजागृती होण्यासाठी तालुक्यातील निस्वार्थी शिक्षकांचा आधार घेऊन पथनाट्यच्या आधारे प्रबोधन करण्याचे सुद्धा काम तहसीलदारांच्या सहकार्याने झाले .

कोरोनाचे संकट सुरु असतानाही शासनाच्या वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून १५ ऑक्टोबर २०२० रोजी साहेबांच्या सहकार्याने तसेच आपल्या सुधागड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. वसंतराव ओसवाल यांच्या परवानगीने पालीवाला महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे तसेंच बल्लाळेश्वर देवस्थान यांच्या मदतीने तसेच अनेक मार्गदर्शक शिक्षकांच्या मार्गदर्शनाने मोफत पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण सुद्धा सुरु केले होते . या प्रशिक्षणार्थींना राहण्याची सोय ,जेवणाची सोय, इतर सर्व सुविधा कशी देता येईल याकडे ते बारकाईने लक्ष देत होते . या प्रशिक्षणासाठी विद्यार्थाना मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून तहसीलदार रायन्नावार यांच्या आग्रहखातर स्पर्धा परीक्षेचे अनेक वर्षांचे अनुभव असलेले मार्गदर्शक कोणत्याही प्रकारचे मानधन न घेता येत होते .

आगामी पोलीस भरतीमध्ये सुधागड तालुक्यातील जास्तीत जास्त पोलीस सेवेत रुजू व्हावे यासाठी तहसीलदार यांनी खूप मेहनत घेतलेली आहे. म्हणून आगामी काळात सुधागड मध्ये पोलीस म्हणून अनेक तरुण रुजू होतील यामध्ये तहसीलदार रायन्नावार यांचे योगदान महत्वपूर्ण ठरणारे आहे. तसेच रायगड जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून गरुडझेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्गत सुधागड तालुक्यातील अनेक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे अद्यावत ज्ञान आदिवासी व गरीब विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी कातकरी सुधागड तालुक्यातील साधारण ३४ गावात स्पर्धा परीक्षेसाठी लागणारे पुस्तके ग्रंथालयाच्या माध्यमातून पोहचवण्याचे कामं तहसीलदार रायन्नावार यांनी केले आहे. तसेच कातकरी उत्थान अंतर्गत सप्तसुत्री कार्यक्रम सुधागड तालुक्यात अतिशय अचूकपणे राबविण्यात आला.

तसेच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी कार्यक्रमासाठी तालुक्यातील प्रत्येक गावात, शाळेत, महाविद्यालयात विविध उपक्रम राबविले. यात शेतकरी मेळावा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा , रांगोळी स्पर्धा, ग्रंथालय वाटप असे विविध कार्यक्रम घेतले. रायगड जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली व शिवऋण प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय सुधागड हाप मॅरेथॉन स्पर्धा आंतरराष्ट्रीय खेळाडू ललिता बाबर यांच्या उपस्थितीत पार पडली . या मॅरेथॉन मध्ये राज्यातून सुमारे २०० स्पर्धक व रायगड जिल्ह्यातून सुमारे १०० स्पर्धकांनी सहभाग घेतला. तसेच स्वदेश फाउंडेशन, प्राइड इंडिया, वातावरण फाउंडेशन, प्रगती फाउंडेशन अशा अनेक एन जी ओ च्या माध्यमातून तालुक्यातील सर्वागिण विकासासाठी केला आहे.

त्यामुळे तहसीलदार दिलीप रायन्नावार यांच्यासारखे सामाजिक बांधिलकी जपणारे सेवाभावी प्रशासकीय अधिकारी कायम जनतेच्या मनात स्मरणात राहतील अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# न्यु इंग्लिश स्कुल तळवडे येथे वन्यजीव सप्ताह संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

दरवर्षी दि.०१ ते ०७ ऑक्टोबर या कालावधीत वरिष्ठ वन अधिकारी रोहा व वनक्षेत्रपाल अधिकारी म्हसळा यांचे मार्गदर्शनाखाली म्हसळा तालुक्यात वन अधिकारी हे वन्यजीवांबद्दल स्थानिक ग्रामस्थ, विद्यार्थी यांच्यामधे आस्था, जनजागृती निर्माण व्हावी, वन्यजीवांचे संरक्षण व्हावे याकरिता वन्यजीव सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे या वर्षी देखील न्यु इंग्लिश स्कुल तळवडे माध्यमिक विद्यालयात संयुक्त वन व्यवस्थापन समिती कोळे यांचे माध्यमातून वन्यजीव निबंध स्पर्धा आयोजन केले होते त्यामध्ये वन्यजीव व मानव संघर्ष कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना याबाबत उत्कृष्ट निबंध लिहणाऱ्या विद्यार्थी यांचे १ ते ३ क्रमांक काढून त्यांना प्रथम क्रमांक कु.निरुपा रविंद्र शिगवण ५००/रु., द्वितीय क्रमांक कु.आर्या विश्वनाथ शिर्के ३००/- रू., आणि तृतीय क्रमांक कु.वेदिका शशिकांत भोगल २००/- रू. रोख रक्कम बक्षीस व प्रशस्ती पत्र देऊन उपस्थितांचे हस्ते गौरविण्यात आले.

आयोजित कार्यक्रम प्रसंगी वन समिती अध्यक्ष किरण पालांडे, पोलीस पाटील महेंद्र विचारे, ग्रामस्थ सदाशिव साळुंखे, वनरक्षक भिमराव सुर्यतल, वनरक्षक अतुल अहिरे, मुख्याध्यापक श्री.मोरे सर, शिक्षक अर्बन सर, पावरा सर, बडे सर, केतकर सर, कलंत्रे सर, मुसळे सर, विद्यार्थी उपस्थित होते. वनरक्षक भिमराव सुर्यतल यांनी गायनातुन उपस्थितांना वने व वन्यजीव यांचे निसर्गातील महत्व विशद करून सांगितले तसेच विद्यार्थ्यांनी मनोगतपर भाषणातून वन्यजीवांचे व निसर्गाचे नाते कसे आहे आणि या नात्यामध्ये मानवाने केलेला हस्तक्षेप किती हानिकारक आहे याबाबतीत माहिती सांगितली. त्याचप्रमाणे वन समिती अध्यक्ष किरण पालांडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, वने व वन्यजीव यांचे पर्यावरणाचा समतोल राखण्यामध्ये महत्वाचे स्थान असुन त्यांचे संरक्षण करणे आपले प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे ते आपण योग्य रित्या पार पाडण्यासाठी कटिबद्ध असले पाहिजे असे सांगून म्हसळा वन विभागाचे काम कौतुकास्पद असुन, मानव व वन्यजीव यांच्यातील वाढता संघर्ष कमी करण्या करिता वरिष्ठ वन अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली वन कर्मचारी चांगले काम करीत आहेत. एखाद्या शेतकऱ्याचे वन्यप्राण्यांपासुन पाळीव जनावरांची, शेत पिकाची नुकसानी झाल्यास तात्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई मिळवुन देण्याचे काम करीत आहेत असे सांगताना वन्य जीवांचे संरक्षण करणे काळाची गरज आहे असे वन समिती अध्यक्ष किरण पालांडे यांनी सांगितले. श्री.कलंत्रे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# मानसिक आरोग्याचे पोषण विषयावर विद्यार्थ्यांकडून पथनाट्य

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मानसिक आरोग्य जागरूकता दिनानिमित्त नवी मुंबईतील सेक्रेड हार्ट हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजच्या एसवायजेसी (कला) विद्यार्थ्यांनी 'मानसिक आरोग्याचे पोषण करणे' हे पथनाट्य सादर केले. विशेष म्हणजे पथनाट्याची संकल्पना व स्क्रिप्ट विद्यार्थ्यांनीच केली होती. मानसिक आरोग्य ही केवळ मानसिक आजारी लोकांसाठीच चिंताजनक आहे असा एक गैरसमज आहे. प्रत्यक्षात हा आपल्या एकूण आरोग्याचा एक महत्त्वाचा तरीही दुर्लक्षित भाग आहे. त्यामुळे सामान्य लोकांमध्ये मानसिक आरोग्याचा अर्थ आणि महत्त्व याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी पथनाट्य प्रभावी माध्यमाचे आयोजन करण्यात आले होते. असल्याने या फोर एस च्या अनुषंगाने स्व-स्वीकृती, स्वत:ची काळजी, एकमेकांना आधार देणे आणि प्रेमाने सेवा अशी मानसिक आरोग्याच्या रूपरेषा या पथनाट्यातून मांडण्यात आली.






हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## परतीच्या पावसाने मुरुडला झोडपले ; सर्वाधिक मुरुडमध्ये पाऊस

**दै.रायगड नगरी । मुरुड**

गेले दोन दिवस कोसळत असलेल्या परतीच्या पावसाने मुरुडला झोडपले. रायगड जिल्ह्यात सर्वाधिक मुरुड मध्ये पाऊस झाला. गेल्या २४ तासात १६१ मी.मी. पावसाची नोंद झाली असून आतापर्यंत २४४४ मी.मी. पाऊस मुरुड मध्ये झाला आहे. या परतीच्या पावसाने उभी भात पीके झोपली असल्याने शेतकऱ्यांना मात्र चिंता पडली आहे. पुन्हा सुप्त झालेले धबधबे खळाळून वाहू लागले.

सगळीकडेच परतीच्या पावसाने हजेरी लावली असली तरी जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस मुरुड तालुक्यात नोंदविला आहे. या पावसामुळे बोलवली मांडला स्टँड जलमय झाला होता. मुरूड शहरातील बाजारपेठ, गोलबंगला परिसरात पाणी साचले होते. कोळी बांधवांनी संपूर्ण रात्र होडीत जागून पावसाचे पाणी होडीतून काढण्यात घालवली. या पावसामुळे उभी पिके आडवी झाल्याने शेतकरी मात्र चिंतेत पडला आहे. दि. ०८ सकाळ पर्यंत पडणाऱ्या पावसाने सकाळी १० पासून उसंत घेतली व ऊन पडून पावसाने विश्रांती घेतली होती.

जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस मुरुड १६१ मी.मी., अलिबाग ११६ मी.मी., पेण ६२ मी.मी., पनवेल १४० मी.मी., उरण १०० मी.मी., कर्जत ५६ मी.मी., खालापूर ५८ मी.मी., माणगाव ११२ मी.मी., रोहा ९९ मी.मी., सुधागड २७ मी.मी., तळा ९५ मी.मी., महाड ३७ मी.मी., पोलादपूर १६ मी.मी., म्हसळा १०६ मी.मी., श्रीवर्धन १०५ मी.मी., माथेरान ११४ मी.मी., एकूण १४१४.४० मी.मी. सरासरी ८८.४० मी.मी. पावसाची नोंद झाली आहे.



# जामीनावर सुटून पुन्हा केली चोरी; सराईत गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जामीनावर सुटून पुन्हा चोरी करणाऱ्या आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे. या आरोपीकडून पोलिसांनी चोरी केलेल्या ५ तोळे सोने व ५ हजार रुपये असा एकूण २ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. मंदिरातील दानपेटी चोरीचा तपास करत असताना चोरटा पळून जाताना त्याच्या चिखलात उमटलेल्या पाउल खुणाचा अभ्यास करून पोलिसांनी चोरट्याला शोधून काढले आहे. विशेष म्हणजे पाउलखुणातून आरोपी उजव्या पायाने लंगडा असल्याचेही समोर आले आणि एक अट्टल गुन्हेगार पोलिसांच्या हाती लागला.

गुरूनाथ तुकाराम वाघमारे असे आरोपीचे नाव आहे. सदर आरोपीने आपटा फाटा येथील श्री स्वामी समर्थ मंदिराची दानपेटी चोरी केली होती. तसेच तसेच मंदीराच्या बाजूला राहणारे मंदीराचे विश्वस्त अंजली मिलिंद मुणगेकर यांच्या घराचे मागील दरवाजाचा कडी कोयंडा तोडून घरामध्ये प्रवेश करुन कपाटाचे लॉकर मध्ये ठेवलेले देवीचे वापरातील अडीच लाख रुपये किमतीचे ५ तोळे सोन्याच्या दागीन्यांची चोरी केली होती. या बाबत पनवेल तालुका पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. मंदीरातील चोरी गेलेले देवीचे दागिणे व दानपेटी भाविकांच्या आस्थेशी निगडीत असल्याने नवी मुंबई पोलीस आयुक्त व पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई यांनी गुन्हयाची संवेदनशीलता लक्षात घेवून तात्काळ सदर गुन्हा उघडकिस आणण्याचे दिले होते. तसेच मंदीरा-तील भाविक व लोकप्रतिनिधींनी पोलीस आयुक्त यांना विनंती केल्याने सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग करणेबाबत आदेशित केले परंतु गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून परिमंडळ-२ चे पोलीस उपआयुक्त शिवराज पाटील व पनवेल विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे यांचे सूचनेनुसार सदर गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा पथकाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अविनाश पाळदे व पथकाने सुरु केले असता तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेज मध्ये आरोपी हा चेहऱ्याला काळा कपडा बांधून अंगावर फक्त हाफ पॅन्ट व दानपेटी घेवून जाताना दिसत होता. गुन्ह्याची कार्यपद्धत, घटनास्थळ, वेळ व इतर परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण



केले असता मंदीराच्या मागील भागात चिखलात मिळालेल्या पाउलखुणा, पाउलखुणांची दिशा मिळून आल्या.

आरोपी हा नदीकिनारी असलेल्या चिखला-तून गेल्यामुळे आरोपीच्या डाव्या पायाच्या ठळक पाउलखुणा दिसत होत्या व उजव्या पायाचे पाउलखुणा स्पष्ट दिसत नव्हत्या. यावरून सदर आरोपी हा एका पायाने लंगडत चालणारा असावा व मुख्य रस्त्यावरील सीसीटीवी फुटेजमध्ये आरोपी दिसत नसल्याने तो नदी पार करून पलीकडील पेण तालुक्यातील आदीवासी पाडयांच्या दिशेने गेला असावा असा निष्कर्ष काढला. यावरून गुप्त बातमीदारामार्फत पेण तालुक्यातील आदीवासी पाडे तसेच इतर परीसरात अशा वर्णनाचा व गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या इसमाचा शोध घेतला असता खैरासवाडी, पोस्ट जिते, तालुका पेण, जिल्हा रायगड. येथे अशा वर्णनाचा एक इसम राहत असल्याची माहीती मिळाली. परंतु तो सध्या पेण पोलीस ठाणेच्या गुन्हयात अटक असल्याचे समजले. सदरबाबत पेण पोलीस ठाण्यातील गुन्हेगारी अभिलेख तपासता सदर इसमहा दोन दिवसापूर्वी कारागृहातून सुटल्याची माहीती मिळाली व तो एका पायाने लंगडत चालत असल्याचे पेण पोलीसांकडून कळाले यावरून सदर गुन्हा त्यानेच केला असल्याची खात्री झाल्याने त्याचे रहाते घराचे परीसरात सापळा लावून त्याला ताब्यात घेतले व त्याने चौकशीअंती सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली.

या आरोपी कडून पोलिसांनी २ लाख ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदर अटक आरोपीवर यापूर्वी मंदिरातील दानपेटी चोरीचे दोन गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली असून सदर गुन्ह्यात जामिनावर सुटताच दोन दिवसांमध्ये त्याने प्रस्तुत गुन्हा केला आहे.

# २७ लाख ७७ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सोफा बेड खरेदी करत असल्याचे भासवून सत्तर वर्षे ईसमाची २७ लाख ७७ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. आरोपींविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सेक्टर २०, कामोठे येथे राहणारे अजय उमापद मित्रा हे सेंट्रल बँक मुंबई येथून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी नोव्हेंबर २०२१ मध्ये घरातील सोफा बेड विक्री करण्याकरता जाहिरात देऊन २५ हजार रुपये किंमत टाकली होती. त्यानंतर त्यांना संजय चौधरी याचा फोन आला व त्याने फोन पे द्वारे पैसे पाठवतो असे सांगितले. यावेळी त्यांना बोलण्यात गुंतवले व अजय मित्रा यांच्या बँक खात्यातून पैसे कट झाले. त्यानंतर त्यांना दीपक शर्मा यांचा फोन आला पुन्हा अजय मित्रा यांच्या बँक खात्यातून पैसे कट झाले. त्यानंतर सुनील अग्रवाल, अरुण कुमार, मोहम्मद इम्रान, मोहित शर्मा, चिरण, राजेश व्यास यांनी अजय मित्रा यांच्याशी संपर्क करून पैसे परत पाठवतो असे सांगितले. व मित्रा यांची गुगल पे व एन ई एफ टी द्वारे २७ लाख ७७ हजार २३५ रुपयांची ऑनलाइन फसवणूक केली. या प्रकरणी संजय चौधरी, दीपक शर्मा, अरुण कुमार, मोहम्मद इमरान, मोहित शर्मा, चिरण, राजेश व्यास यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पनवेल येथे कोजागिरी पौर्णिमेस दमा विकारावर रामबाण वनौषधी देण्यात येणार


**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोजागिरी पौर्णिमेस दमा विकारावर रामबाण वनौषधी ठिकाण – श्री स्वामी समर्थ मठ, गावदेवी मंदिराजवळ, गावदेवी पाडा, पनवेल येथे देण्यात येणार आहे. ऋषि मुनींपासून चालत आलेली ही वनौषधी कोजागिरी पौर्णिमेस रात्रौ बारानंतर प्राशन करावी. या दिवशी शाकाहारी जेवण करावे. सलग तीन वर्षे औषध घेतल्यास दमा पूर्णपणे बरा होतो, असा आयोजकांचा दावा आहे. दमा रूग्ण किंवा रासायनिक कारखान्यात काम करणारे कामगार यांनी याचा अवश्य लाभ घ्यावा.

संपर्क : श्री स्वामी समर्थ मठ, गावदेवी पाडा, पनवेल, अतुल- ९८१९६०६२१२ आलोक – ९७०२१२२१२३, ओंकार – ९८२०४२४२७४, व्हॉट्सअपवर संपर्क करून नाव नोंदवावे. भारतीय सैन्य दल, पोलीस यांना औषध मोफत देण्यात येईल. औषधाची नाममात्र किंमत ६०/- रू. राहील.

डायबिटीज साठीची वनौषधी रु. ५०/- व दम्यासाठी पावडर प्रती पॅकेट रु. ४०/- राहील. रविवार दि. ९.१०.२०२२ रोजी रात्रौ १२.३० वाजता देवी पुजनानंतर नंबराप्रमाणे औषधी वाटप करण्यात येईल, अशी माहीती १) अतुल अनंत पाटणकर, समाजसेवक मो. ९८१९६०६२१२ व २) सुधाकरभाऊ घरत, समाजसेवक मठाधिपती मो. ९८६७६७६८६७ यांनी दिली.

# उरण तालुक्यात सरत्या पावसाच्या हजेरीने शेतकरी हवालदिल



**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात दरवर्षी नवरात्रीत अचानकपणे हजेरी लावणारा सरता पाऊस यंदा नवरात्रौत्सवात उसंती देणाऱ्या पावसाने दोन दिवसांपासून संपुर्ण उरण तालुक्यात हजेरी लावली आहे.पर्वा अर्धा तास तर काल सकाळी ११ : ३० पासून एक तास व दुपारीही २ वाजताचे सुमारास जोरदार पाऊस कोसळला आहे.

आज दिनांक ८ ऑक्टोबर रोजी दिवसभर सतत पाऊस सुरु आहे.या पावसामुळे निर्माण झालेल्या गारव्याने उष्णतेमुळे हैराण झालेल्यांना उकाडा कमी होऊन दिलासा मिळाला आहे.वातावरणात थंडावा निर्माण होत आहे.मात्र महागाईच्या जोखडात अडकलेल्या गरीब व सामान्य शेतकऱ्यांना न परवडणारे शेती आणि त्यामध्ये लागवड करण्यात आलेल्या भातपिकांना फुलोरा येण्याच्या अवस्थेत असतांना या सरत्या पावसाचा फटका बसत असून, हातातोंडाशी आलेले शेतातील भातपिक कोसळून अतोनात नुकसान होत आहे. या शिवाय काही उंच जमीन असलेल्या भातशेतीत चिऱ्या कोलम,हलवा व अन्य लवकर होणारी भातपिके यांचेही पिक शेतकऱ्यांच्या हातून जाऊन त्याची नासाडी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.त्यामुळे येथील शेतकरी पिकनुकसानीच्या संकटात सापडला आहे.त्यातच हा सरता पाऊस अजून किती दिवस कोसळणार याचाही अंदाज येत नसल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले असून,शेतकरी हवालदिल झाला आहे.

मा.गुन्नाल साहेब

अॅड.अनिल रा.नागदेवे

अॅड.संजय कि. कानडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३६८/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.६/१२/२०२२

विठ्ठल बाळु भस्मा (मयत) यांचे वारस
१) श्रीमती.कल्पना विठ्ठल भस्मा
वय : ५० वर्षे, धंदा : घरकाम
२) श्री.सुरेश विठ्ठल भस्मा
वय : ३३ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.विलेश विठ्ठल भस्मा
वय : ३१ वर्षे, धंदा : शेती
अनु क्र.१ ते ३ रा. सर्व रा.मु.धामणी, पो.वाजे,
ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.संध्या विठ्ठल भस्मा उर्फ संध्या नितीन पादिर
वय : २७ वर्षे, धंदा : घरकाम
रा.मु.नालधेवाडी, पोस्ट : सुगवे,
ता.कर्जत, जि.रायगड ... अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.विठ्ठल बाळु भस्मा यांचे निधन दि.१४/०७/२०२२ रोजी धामणी, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले आहे. सबब अर्जदार यांनी कै.विठ्ठल बाळु भस्मा यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळावा म्हणून मे.कोर्टात अर्ज केलेला आहे. कै.विठ्ठल बाळु भस्मा हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पनवेल शहर विभागांतर्गत भांडार कक्ष येथे मुख्य तंत्रज्ञ या पदावर नोकरीस होते. महावितरण कंपनी पनवेल शहर तर्फे कार्यकारी अभियंता यांनी दि.२२/०८/२०२२ रोजी अर्जदार क्र.१ च्या नावे पत्र दिलेले असून कुटुंब सेवानिवृत्त प्रकरणाची पुर्तता करणेकामी वारसदाखला लवकरात लवकर दाखल करावा असे सांगितलेले आहे. सबब, अर्जदारास सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल करणे गरजेचे झालेले असल्याने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार हे कै.विठ्ठल बाळु भस्मा यांच्या वारस दाखल्यास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हा वारस दाखला मंजूर करेल.

आज दि. / /२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे १) श्री.प्रितम चंद्राहास गुप्ता, २) श्री.मोहम्मद अफसर मोहम्मद अखतर खान पत्ता : ५१, एन.एम.एस. आयकॉन, प्लॉट नं.१९४, सेक्टर-१९, उलवे, नवी मुंबई-४००७०६, यांनी मुळ मालक श्रीमती.चांगुणा उंद्रया गायकवाड व सौ.मंदा अरुण कांबळे उर्फ मंदा उंद्रया गायकवाड, रा.कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड यांच्याकडून त्यांच्या मलकीच्या जमिनीच्या संपादनापोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे खालील भूखंड मिळालेला असून सदरहू भूखंड आमचे अशिल यांनी भूखंड खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू भूखंडाचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**सिडको संचिका क्र.२८७**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| कामोठे | २१ | ११६ | ३९.२४ चौ.मी. |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे
दि.८/१०/२०२२

**सही/-**
**अॅड.रेखा होवाळे**
**मो.क्र.८३६९०१७३६३**

# मीटरप्रमाणे रिक्षा चालकांनी भाडे आकारावे यासाठी आज पनवेलमध्ये बैठकीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

'रिक्षा मीटर भाड्यावर बोलू काही', या आशयाखाली पनवेल महापालिका क्षेत्रातील प्रवासी, नागरिक आणि रिक्षा चालकांची संयुक्तिक बैठक पनवेल संघर्ष समितीने उद्या रविवारी (ता. ९) सकाळी ११ वाजता ज्येष्ठ नागरिक सभागृह, ठाणा नाका येथे आयोजित केली आहे. मोठ्या संख्येने संबंधितांनी उपस्थित राहून या चळवळीची मुहूर्तमेढ रोवून लढा यशस्वी करू या, असे आवाहन समितीचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांनी केले आहे.

'नवीन पनवेलकर्स' नावाच्या सोशल मीडियावर एका अज्ञात व्यक्तीने रिक्षा मीटर भाड्याबाबत पोस्ट व्हायलर करुन जाणीवपूर्वक स्वतःची ओळख लपवत समाजात दुही निर्माण करण्याचा प्रयत्न गेल्या आठवड्यात केला होता. त्या अज्ञात व्यक्तीला पनवेल संघर्ष समितीचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांनी थेट आव्हान देत, याप्रश्नी मार्ग काढण्यासाठी लवकरच बैठक घेण्याचे घोषित केले. त्या नंतर तो तथाकथित भाड्या गायब झाला.

दरम्यान, सुरेंद्र अंबोले यांनी कांतीलाल कडू यांना पोस्ट टॅग करून बैठक बोलावण्याविषयी विनंती करत कौतुक केले. समाजाला दिलेल्या शब्द-ानुसार कांतीलाल कडू यांनी पुढाकार घेत पनवेल महापालिका क्षेत्रातील सर्व शहरांतील प्रवासी, नागरिक आणि रिक्षा चालक, मालकांना बैठकीत सहभागी होण्याचे आवाहन करत उद्या रविवारी बैठक घेण्याचे घोषित केले. त्यामुळे समाजात विसंतुष्टवाद पसरविण्याचा प्रयास करणाऱ्यांचे चेहरे काळवंडले आहेत.

उद्या, अत्यंत महत्वाच्या रिक्षा भाडे मीटरप्रमाणे आकारणीवर महत्वपूर्ण चर्चा करून मार्ग काढण्याचा विचार पक्का केला जाईल, असे कांतीलाल कडू यांनी सांगितले आहे. तेव्हा जास्तीत जास्त संख्येने या बैठकीत सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवाशांच्या वतीने सुरेंद्र आंबोले यांनी सह्याची मोहीम सुरु करण्याचा विषय सुचविला आहे. त्याचीही सुरुवात उद्याच केली जाईल. एकंदरीत अत्यंत जटील बनलेल्या रिक्षा भाड्याबाबत उद्या नक्की काय निर्णय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कळंबोलीत भव्य रक्तदान उत्सवाला प्रारंभ

## व्यापारी, नागरिक, सामाजिक संस्थांचा सहभाग

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

नवी मुंबई पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनानुसार कळंबोली पोलीस ठाणे, कळंबोली व्यापारी संघटना, मेडिकल सप्लायर संघटना व अन्य सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने कळंबोलीतील सुधागड विद्यालयात शनिवारी सकाळी भव्य दिव्य स्वरूपात रक्तदान उत्सवाला प्रारंभ करण्यात आला .या रक्तदान उत्स-वाचे उद्घाटन नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. कळंबोलीतील सुधागड विद्यालयाच्या नवीन इमारतीतील सभागृहात हे दोन दिवस रक्तदान शिबिर चालणार आहे. समाजातील विविध सरातील नागरिकांचा या रक्तदान उत्स-वाला भरभरून पाठिंबा मिळत असल्याचे कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी सांगितले आहे.




समाजामध्ये कोरोना काळानंतर रक्तदानाची कमतरता खूपच भेडसावू लागल्याचे लक्षात येताच कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी त्यांच्या संकल्पनेतून भव्य दिव्य रक्तदान शिबिर आयोजित करून जास्तीत जास्त रक्त बाटल्या संकलित करण्याचा मनोदय व्यक्त केला. यासाठी कळंबोली वसाहती मधील व्यापारी ,मेडिकल ,हॉटेल व्यवसायिक संघटना ही सामाजिक बांधिलकी जोप-ासून पुढे सरसावल्या. या भव्य दिव्य रक्तदान शिबिराला विविध सामाजिक संघटना, गणेशोत्सव मंडळे यांनीही रक्तदान करण्याचा संकल्प करून पो-लीस ठाण्याच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाला पाठिंबा देऊन सामाजिक बांधिलकी जोपासली आहे .शनिवारी सकाळी झालेल्या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनाला नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह ,नवी मुंबईचे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, नवी मुंबईचे सहाय्यक उपायुक्त भागवत सोनावणे, मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष विवेक शिंदे, सुधागड विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे , हॉटेल व्यवसायिक संघटनेचे अध्यक्ष सदानंद शेट्टी,व्यापारी संघटना व शिरवी समाजाचे अध्यक्ष धनाराम गेलहोत , माजी नगरसेवक रवींद्र भगत सहित विविध सामाजिक संघटना गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी व नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. ढोल ताशाच्या गजरात या रक्तदान उत्सवाला प्रारंभ करण्यात आला.

रक्तदान शिबिरात दोन अंध व्यक्तींनीही रक्तदान करून आपली सामाजिक प्रती असलेला आदर व्यक्त केला.यावेळी सिरवी समाजाच्या नागरिकांनी पारंपारिक राजस्थानी वेशभूषित उपस्थिती दर्शवल्याने उत्सवाला अधिकच रंगत प्राप्त झाली.

याबाबत नवी मुंबईचे आयुक्त बिपिन कुमार सिंह यांनी विशेष व्यापारी संघटनांचे आभार मानले. कळंबोलीतील शेकडो नागरिकांनी रक्तदान उत्सवाला हजेरी लावून आपला सक्रिय पाठिंबा दर्शवून रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी मनोदय व्यक्त केला .मुंबई, नवी मुंबई, ठाणे ,पनवेल येथील रक्त पेढ्यानी यामध्ये सहभाग नोंदवला आहे. ज्या रक्तदात्यांनी रक्तदान केले त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यातही आले. तसेच रक्तदान केल्यानंतर सेल्फी पॉईंटची व्यवस्था ही कळंबोली पोलीस ठाण्याकडून करण्यात आली होती.

# सय्यद अकबर यांना कोकण प्रदेश भाजप सह-संयोजक म्हणून जबाबदारी



**दै.रायड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पक्षाचे अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांना कोकण प्रदेश भाजप सह-संयोजक म्हणून जबाबदारी देण्यात आल्याची घो-षणा भाजप प्रदेश सरचिटणीस आम.संजय किणीकर यांनी केली.

अल्पसंख्यांक समाजाला ज्या योजना मिळाल्या आहेत. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी धन्यवाद मोदीजी अभियान राबवले जात आहे.भाजप प्रदेश सरचिटणीस तसेच अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रभारी संजय किणीकर यांच्या अध्यक्षतेखाली संयोजन सभा मुंबई येथे महाराष्ट्र प्रदेश कार्यालयात संपन्न झाली. सभेत प्रदेश सचिव तथा धन्यवाद मोदीजी महाराष्ट्र भाजप अभियान संयोजक श्वेता शालिनी, अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश अध्यक्ष हाजी एजाज देशमुख, महामंत्री आतिक खान, प्रदेश उपाध्यक्ष इफ्तीकार अत्तार, सलीम बागवान, मेहबुब खेरवा, याकूब सय्यद, एड. तबस्सूम बैरागदार आदी प्रदेश पदाधिकारी उपस्थित होते. अभियान अंतर्गत यामध्ये पीएम स्वनिधी, ग्रामीण स्वयं रोजगार प्रशिक्षण संस्था, मोफत लसीकरण, आंगणवाडी मातृबंध योजना, उज्वला गॅस योजना, पं. दिन दयाल अंत्योदय योजना, पीएम किसान सन्मान निधी योजना, किसान पेन्शन योजना, किसान क्रेडिट कार्ड स्वाईल हेल्थ कार्ड, पीएम आवास योजना, वयश्री योजना, ई-श्रमकार्ड, करोना पेन्शन(मृत कामगारांच्या परिवारासाठी), आयुष्यमान भारत पीएम जनआरोग्य योजना,मोफत लसीकरण पीएम सुरक्षा विमा योजना, जल जीवन मिशन (हर घर नलसे जल योजना), पीएम मत्स्य संपदा योजना अशा अनेक योजना आहेत. त्यामधील अल्पसंख्यांक समाजाला मिळालेल्या योजनापैकी प्रधानमंत्री मोफत रेशन योजना, जनधन योजना, विद्यार्थ्यांना मिळालेली शिष्यवृत्ती योजना आहेत. महाराष्ट्र राज्यातील किमान दहा लाख लाभार्थींना संपर्क साधून धन्यवाद मोदीजी योजना राबावली जाणार आहे.त्यातील अल्पसंख्यांक लाभार्थी सुमारे दिढलाख आहेत.त्यांना संपर्क करण्याची जबाबदारी अल्पसंख्यांक मोर्चाला देण्यात आली आहे.राज्यात यामध्ये पोस्ट कार्डद्वारे सुमारे दहा लाख लोकांना संपर्क होणार आहे. आहे.कोकणातील सर्व अभियानासाठी प्रदेश उपाध्यक्ष इफ्तीकार अत्तार व सय्यद अकबर यांना संयुक्तपणे जबाबदारी देण्यात आली आहे.

# पनवेल - चिरनेर मार्गावर एनएमएमटी बस सुरू करण्याची प्रवाशांची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

चिरनेर ते पनवेल या मार्गावर एसटी बससेवा फार कमी प्रमाणात धावत आहे. कोरोनामुळे आता दोन वर्षांनी एसटी बस सेवा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. मात्र ही एसटी बसची सेवा प्रवाशांसाठी पुरेशी नसल्याने ती कमी पडत आहे. त्यामुळे पनवेल ते चिरनेर या मार्गावर एसटी बस सेवा फार त्रासदायक ठरत असल्याने, नवी मुंबईच्या महानगरपालिकेच्या परिवहन सेवेची एनएमएमटी बससेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे. दरम्यान या मार्गावर प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे.मात्र रिक्षावाल्यांनी २ वर्षांपूर्वी कोरोना महामारीच्या काळात दुप्पट केलेले भाडे आजपर्यंत कमी केलेले नाही.

त्यामुळे प्रवाशांच्या खिशाला चांगलीच कात्री लागत आहे. गरीब व सामान्य प्रवाशांना न परवडणारे असून,त्यामुळे प्रवाशांना मोठा आर्थिक भूर्दंड सोसावा लागत आहे. परिणामी एसटी बसचे प्रवास भाडे हे प्रवाशांना परवडणारे आहे. मात्र एसटी महामंडळाने पनवेल - चिरनेर मार्गावर धावणाऱ्या एसटी बसेसचे प्रमाण हे कमी केले आहे. त्यामुळे येथील नियमित प्रवासी व विद्यार्थी प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. परिणामी या मार्गावरील प्रवाशांना जास्त भाडे देऊन खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. ही खाजगी प्रवासी वाहने पॅसेंजरने फुल भरल्याशिवाय सोडत नाहीत. परिणामी नोकरी धंद्यावर पोहोचणाऱ्या कामगारांना आपल्या कामाच्या वेळेत नीट पोहोचता येत नाही.त्यामुळे अशा प्रवाशांची मोठी हेळसाड होत आहे.

त्याचबरोबर या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना नोकरी धंद्याच्या कामासाठी पनवेल, नवी मुंबई येथे नियमितपणे जावे लागत आहे. यात एसटी बसेसच्या फेऱ्या कमी आणि खाजगी रिक्षावाल्यांची मक्तेदारी त्यामुळे येथील प्रवासी वर्ग मोठ्या अडचणीत सापडला आहे.

याशिवाय कामावरून रात्री उशिरा येणाऱ्या प्रवाशांसाठी एसटी बसेसची अथवा खाजगी रिक्षांची सोय नसल्यामुळे या प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करून, मिळेल त्या वाहनाला हात दाखवून, ते वाहन थांबून त्यांना परतीचा प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे या मार्गावरील एसटीचा प्रवास फार त्रासदायक ठरत आहे.

महिलांना, वृद्धांना व लहान मुलांना बसमध्ये चढणे म्हणजे चेंगराचेंगरीचा प्रवास असायचा. परंतु अलीकडे एसटी महामंडळाने या मार्गावरील एसटी बसेसच्या फेऱ्याच कमी केल्यामुळे प्रवासी व शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. नियमित वेळेत एसटी बस नसल्यामुळे कामगार व विद्यार्थी प्रवाशांना खाजगी वाहनातून प्रवास करावा लागत असून, हा खाजगी वाहनातून प्रवाशांचा होणारा प्रवास हा थेट पनवेल किंवा नवी मुंबई पर्यंत होत नसल्यामुळे येथील सर्व स्तरातील प्रवासी वर्गाला मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. त्यामुळे नवी मुंबईच्या महानगरपालिकेच्या परिवहन विभागाने या मार्गावरील ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी पनवेल ते चिरनेर अशी एनएमएमटी बससेवा सुरू करावी अशी मागणी येथील प्रवाशी वर्गातून करण्यात येत आहे.

# रोह्यात जोरदार पाऊस, बळीराजा चिंतातुर हातातोंडाशी आलेला घास हिरावणार

## मोत्यासारखी कणसे मातीमोल

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यात पुन्हा पावसाचा जोर बळीराजा चिंतातुर तर हातातोंडाशी आलेला मोत्याचा घास वरून राजा हिरावून नेतो की काय ही चिंता आता शेतकरी बळीराजाला पडली आहे .काळ गुरुवारी रात्री धुवांधार पसवसाने पुन्हा सुरुवात केली त्यात शुक्रवारी दिवसभर आभाळात अंधार त्यामुळे अधिक पावसाच्या सरी कोसळतात की काय याच संकटात सापडलेल्या बळीराजाची चिंता वाढली त्यामुळे शेतात मोत्या सारखं आलेलं भातच पीक याची नासधूस होते की काय त्यामुळे येथील शेतकरी बळीराजा हवालदिल झाला आहे.

ऐन नवरात्रोत्सव काळात दमदार व विजांचा कडकडाट करत जोरदार पावसाच्या कोसळणाऱ्या सरीने दांडिया खेळणाऱ्या युवक युवतींचा मोठा हिरेमुड झाल्याचे ३० सप्टेंबर २०२२ रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास कोलाड सुतारवाडी खांब परिसरामध्ये ढगांच्या गडगडाटांसह दमदार पावसाने जोरदार एन्ट्री केल्याने व त्याने ढगाळ वातावरणाचे रुद्ररूप धारण केल्याने ऐन नवरात्रोत्सव काळात गरबा नृत्य करणारे नाराज झाले होते. शुक्रवारी सात ते आठच्या सुमारास विजांचा कडकडाट करत पाऊस सुरू होताच नवरात्रीच्या दिवसात विविध कार्यक्रम करणारे ग्रामस्थ व महिला यांना देखील चिंता लागली की हा पाऊस रात्रभर असाच पडत राहिला तर गरबा कार्यक्रम होणार नाही असे असतानाच रात्री आठ नऊ नंतर पाऊस गायब झाला व त्यांनी विश्रांती घेतली तद्नंतर युवक मंडळींचा दसरा उत्सवात आनंद गगनात मावे ना. त्यामुळे अनेक गरबा नृत्य तरुण-तरुणींना दिलासा मिळाला आणि डीजे दांडिया ठेक्याचा सूर धरत आनंद लुटला परंतु तद्नंत पुन्हा गुरुवारी ६ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास धडक देत जोरदार पाऊस पडला त्यामुळे हा पाऊस आता बारमाही झाला की काय हाच प्रश्न निर्माण झाला आहे.

रोहा तालुक्यात गुरुवारी रात्री व शुक्रवारी पहाटेच्या सुमारास परतीच्या पावसाने आ-पले रुद्ररूप धारण करत जोरदार हजेरी लावली . तालुक्यातील धाटाव परिसरात लाढंर, बोरघर, निवी, तर खांब ,धामणसई, कोलाड,सुतारवाडी,चणेरा या विभागात जोरदार पाऊस पडला. त्यामुळे याचा थेट परिणाम खरिपाच्या पिकांवर फटका बसण्याची भीती निर्माण झाली आहे . मागील काही दिवस ढगाळ वातावरणामुळे शेतकरी चितांतुर झाले असून पिकांवर रोगाचा प्रादुर्भाव होतो कि काय अशा भितीमुळे शेतकरी किटक किडनाशक फवारणी करत आपले पीक वाचविण्यात यशस्वी ठरले मोत्यासारखे कणसे आली त्यातच काल जोरदार झालेल्या पावसात आता पिकलेली भातशेती तसेच नाचणी वरी हे देखील पीक घोक्यात असल्याने पूर्णतः बळीराजा चिंतातुर झाला असून त्याची मोठी चिंता वाढली आहे.



# व्यास अकॅडमीला लागली आग; जीवितहानी टळली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथील एका क्लास अकॅडेमीला अचानकपणे लागलेल्या आगीत कार्यालयाचे मोठे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही.

कंळबोलीतील सेक्टर ३ई येथे व्यास अकॅडमीमध्ये क्लास सुरु असतानाच आज सकाळी अचानकपणे आग आगली. यावेळी क्लास मध्ये १० ते १२ मुले उपस्थित होते. सुदैवाने या घटनेमध्ये कोणतीही हानी नाही झाली. दरम्यान आगीच्या घटनेची माहिती मिळताच सिडको अग्नीशमनदलाचे बंब घटनास्थळी दाखल होत त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. या अकॅडमीत आठवी ते दहावीच्या मुलांचे क्लास घेण्यात येतात. दरम्यान आज दुपारच्या सुमारास अकॅडमीमध्ये असलेल्या एसीच्या कॉप्रेसरला अचानक आग लागली. सुदैवाने या घटनेमध्ये कोणतीही हानी नाही झाली. दरम्यान आगीच्या घटनेची माहिती मिळताच अग्नीशमन दलाचे अधिकारी सौरभ पाटील आपल्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवले.


Kokilaben Dhirubhai Ambani hospital
NAVI MUMBAI
Every Life Matters



३६०° ऑर्थोपेडिक सेवा

ऑर्थोस्कोपी | स्पाईन सर्जरी | जॉईंट रिप्लेसमेंट | पेडिअॅट्रिक ऑर्थोपेडिक्स | ट्रॉमा अँड फ्रॅक्चर्स



हाडं व सांध्यांसाठी सर्वोत्कृष्ट केंद्र
ऑर्थोपेडिक सुपरस्पेशालिस्टची टीम
अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर्स
जॉईंट रिप्लेसमेंटसाठी सर्वोत्तम परिणाम देणाऱ्यातील एक
(अंशात्मक आणि 'पुन्हा शस्त्रक्रिया' सहित)
सांधे प्रत्यारोपणासाठी रोबोटिक सहाय्य

सेवेत समर्पित
२५४ स्पेशलाईज्ड डॉक्टर्स
विश्वस्तरीय पायाभूत सुविधा आणि जगातील उत्तम दर्जाचे तंत्रज्ञान

जागतिक दर्जाच्या परिणामांचा विश्वास

EMERGENCY +91 22 7198 1111
APPOINTMENTS & BOARD LINE +91 22 7197 9797

Thane-Belapur Road, Opp Koparkhairane Station, Navi Mumbai – 400 710, India; navimumbai.kokilabenhospital.com /KDAHNaviMumbai